आधुनिकिक्करणाचा अनुसूचित जमातीतील महिलांवर पडलेला प्रभाव एक समाजशास्त्रीय अध्ययन विशेष संदर्भ नांदेड जिल्हा

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड

सामाजिक शास्त्रे विद्याशाखेअंतर्गत समाजशास्त्र विषयांतील पीएच.डी.पदवीसाठी सादर करावयांचा शोधप्रबंधाचा आराखडा.

संशोधक

कांबळे कविता किशनराव

एम.ए.बी.एड.सेट (समाजशास्त्र)

मार्गदर्शक

प्रा.डॉ.बी.आर.भोसले

सहाय्यक प्राध्यापक

पदवी पदव्युत्तर

समाजशास्त्र विभाग

यशवंत महाविदयालय,नांदेड

मार्च - 2018

आधुनिकिकरणाचा अनुसूचित जमातीतील महिलांवर पडलेला प्रभाव एक समाजशास्त्रीय अभ्यास विशेष संदर्भ नांदेड जिल्हा

प्रस्तावना :

आधुनिकिकरण ही एक प्रक्रिया असून त्यादवारे बुध्दी व विज्ञानाच्या माध्यमातून उपलब्ध साधन संपत्तीचा जास्तीत जास्त उपयोग करुन नवसमाज निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो. या प्रक्रियेत विज्ञान,तंत्रज्ञान यांचा विस्तृत वापर शहरीकरण शिक्षणाचा प्रसार,सामाजिक गतिमानता यांना महत्व दिले जाते. लोकशाही,धर्मनिरपेक्षता,सामाजिक न्याय हे बुध्दीनिष्ठता हे आधुनिकिकरण प्रक्रियेचे घटक मानले जातात.

आधुनिकिकरणाची संकल्पना :

अभिजात समाजशास्त्रीय सिध्दांतामध्ये आधुनिकिकरण या संकल्पनेचे स्पष्टीकरण प्रथम दुरखाईन यांनी केले असून त्यांच्या मताने,आधुनिकिकरण म्हणजे सामाजिक विभेदीकरणांची प्रक्रिया होय.मार्क्स यांच्या मते आधुनिकिकरण म्हणजे वस्तूईकरणांची प्रक्रिया होय. वेबरच्या मते आधुनिकिकरण म्हणजे बुध्दीप्रामाण्यवादाची किंवा तार्कीकवादाची प्रक्रिया होय.

आधुनिकिकरण ही एक अशी प्रक्रिया आहे की, ज्यामध्ये एखादा समाज पारंपारिक मूल्य व संस्थाच्या पुढे जाऊन आधुनिक युगानुरुप जीवनपध्दती अंगीकारतो साधारणपणे पारंपारिक मूल्य आणि संस्था शेतीप्रधान अर्थव्यवस्था व सामाजिक जीवनासाठी उपयुक्त मानली जाते.याच्या उलट आधुनिक जीवन पध्दती उदयोग व तंत्रज्ञान प्रधान समाजासाठी उपयुक्त आहे.ही पध्दत आधुनिक युगातील मानवाच्या ईच्छा आकांक्षा व गरजा पूर्ण करु शकते.समाजाच्या आधुनिकिकरणा बरोबर ग्रामीण जीवन शहरी जीवनात परिवर्तीत होते. सामाजिक संबंध हे चालीरिती व परंपरेच्या बंधनापर्यंत मर्यादित राहत नाहीत. उलट ऐच्छिक संबंध स्थापन करण्याच्या शक्यता व संधी वाढतात.नियम व कायदे केवळ परंपरेमूळे पाळले जात नाहीत तर त्यांना तर्काच्या कसोटीवर घासून पाहिले जाते.त्याचप्रमाणे व्यक्तीचे सामाजिक स्थान केवळ जन्माने न ठरता त्याची पात्रता,योगदान,कार्यकौशल्य यांवर ठरवली जाते. राजकीय जीवनात ही अशा प्रकारचे बदल पहावयास मिळतात. परिवर्तन हा युगधर्म आहे.काळानुरुप बदलण्याची व परंपरागत मूल्यांच्या पुढे जाण्याची प्रक्रिया म्हणजे आधुनिकिकरण असे म्हणता येईल.

आधुनिक विज्ञान,तंत्रज्ञान याचा जीवनात वापर करण्याची आकांक्षा समाजाला असते.त्याच्या गरजांची पूर्तता करण्यासाठी आधुनिकिकरणाची कास धरावी लागते.नवीन समस्यांना तोंड देण्यासाठी आधुनिक सुसज्ज यंत्रणेचा वापर जीवनात राजकीय क्षेत्रात अनिवार्य असते.

जेम्स एस.कोलमन यांनी आधुनिकिकरण आणि राजनैतिक विकास हे समांतर चालतात असे सांगून आधुनिक समाजाची कल्पना मांडली आहे.त्यात त्यांने शहरीकरणांचे वाढते प्रमाण साक्षरतेचा प्रसार,दरडोई उत्पन्नाची वाढ,जनसंपर्काच्या साधनांचे जाळे,औदयोगीकरण आणि समाजातल्या लोकांचा राजकारणातला वाढता सहभाग यांचे नाते स्पष्ट केले आहे.थोडक्यात पारंपारिक कृषक ऐतिहासीक समाजात झालेल्या विकास प्रक्रियेला आधुनिकिकरण या संज्ञेने संबोधतात म्हणून मी संशोधनासाठी आधुनिकिकरणाचा अनुसूचित जमातीतील महिलांवर पडलेला प्रभाव हा विषय निवडला आहे.अनुसूचित जमाती म्हणजे आदिवासी होय.भारतीय संविधानात आदिवासींना अनुसूचित जमाती असे संबोधले आहे. भारतीय संविधानातील कलम 342 (1) अनुसार ज्यांचा समावेश अनुसूचित जमातीच्या यादीत केला त्यांना अनुसूचित जमाती असे म्हणतात.अनुसूचित जमातीमध्ये सर्वसाधारणपणे डोंगराळ प्रदेशात आणि जंगलात वास्तव्य करणाऱ्या आणि जे आधुनिक संस्कृत्ती तसेच जीवनपध्दती पासून अलिप्त आहेत अशा लोकांचा समावेश करण्यात आला आहे. म्हणूनच आदिवासी म्हणजे अनुसूचित जमाती असे समीकरण रुढ झाले आहे. जेव्हांपासून आधुनिकिरणाला या समाजात सुरुवात झाली त्याचा अनुसूचित जमातीतील महिलांवर कशा प्रकारचा प्रभाव पडला हा या संशोधनाचा उददेश राहील.

आजही विसाव्या शतकांत सामाजिक,राजकिय,आर्थिक प्रश्नांमध्ये आधुनिकिकरणांचा प्रभाव पडलेला दिसून येतो.ज्यामध्ये सर्वात महत्वाचा प्रश्न म्हणजे स्त्री चळवळ होय. या स्त्री चळवळीपासून अनुसूचीत जमातीतील महिलांचा विकास कसा होत गेला किंवा अनुसूचीत जमातीतील महिलांची स्थिती यांच्यावर पडलेला प्रभाव कसा आहे हे जाणून घेणे.

‘औदयोगिक करणाच्या पुर्व काळांत पुरुषांच्या बरोबरीने स्त्री काम करीत होत्या,तरी त्यांची भूमिका अकुशल काम करणा-याची होती. तशाच प्रकारची कामे त्यांच्याकडे सोपविली जात.तथापि शिक्षणांचा प्रसार होत गेला.तसेच शारिरिक कष्ट कमी असलेले प्रशासकिय व्यावसायिक स्वरुपाची व बौध्दिक स्वरुपातील बैठी कामे त्यांना दिली जावू लागली.पण उत्तर आधुनिकत्तेत स्त्रीया अनेक कामे करतांना आढळतांत. असे असले तरी काही क्षेत्रांत स्त्रीयांना काम करणे अशक्य नसले तरी अवघड असते. उदा.सैन्याच्या युध्दकार्यात,खाणीमधील

भुगर्भकार्यात गोदीमध्ये गाडीतत्वांवर,अवजड हमाली इ. त्याच प्रमाणे स्त्रीयांना अधिक सरंक्षणाचीही आवश्यकता असते. प्रसूतीसाठी त्यांना विश्रांतीसाठी अधिक रजाही दयावी लागते.त्यामुळे स्त्री - पुरुष समानता सर्वच कामांत गृहीत धरता येत नाही.'

'भारतीय घटनेतील धोरणविषयक मार्गदर्शनांत स्त्री आणि पुरुष यांचे समानस्थान आणि समान वेतन या तत्वांचा निर्देश केलेला आहे. तरी ही स्त्रियांचे विशेष स्थान लक्षात घेवून प्रत्येक जातीतील स्त्रीयांसाठी वेगळे कायदे करावेच लागतात.प्रसूतीकालीन रजा,पाळणांघरांची सोय यासारख्या सवलती त्यांना उपलब्ध करुन दयाव्या लागतात. त्यांचे आरोग्य,शिक्षण आणि स्वास्थ्य याकडे विशेष लक्ष दयावे लागते.

शारिरिक श्रमांच्या व्यवसायांत जसे स्त्री कामगारांचे प्रमाण वाढत आहे. तसे बौध्दीक व तांत्रिक व्यवसायातही त्यांची नियुक्ती वाढत आहे. स्त्री शिक्षणांच्या विस्ताराबरोबरच शास्त्रज्ञ,यंत्रज्ञ प्रकाशक,संशोधक,वाणिज्य शास्त्रज्ञ इ.सर्व क्षेत्रांत स्त्रीयांचा सहभाग दिसून येतो. सर्व स्तरावरंचे शिक्षण क्षेत्र,शासकिय कार्यालये,सर्व प्रकारची औदयोगिक कार्यालयीन कामे,बॅका आयुर्विमा महामंडळे अशा विविध क्षेत्रांत विविध जाती - जमातीतील स्त्रीया काम करतांना दिसतांत.'

'फ्रेंच राज्यक्रांतीच्या वेळी स्त्रीयांना मताधिकार मिळावा म्हणून चळवळ सुरु झाली. इंग्लंडमध्ये जॉन स्टुअर्ट मिल सारख्या विचारवंतानी स्त्री मताधिकाराच्या विचारांचा पुरस्कार केला.परंतु या चळवळीला विधायक स्वरुप एकोणीसाव्या शतकांच्या अखेरीस व विशेषतः पहिल्या महायुध्दानंतर आले. औदयोगिक प्रगती बरोबर स्त्रीही पुरुषांबरोबर घराबाहेर पडून निरनिराळया जबाबदा-या यशस्वीरित्या पार पाडू लागली.इ.स.1869 मध्ये इंग्लड मधील नगरपालिकेच्या निवडणुकीत स्त्रीयांना प्रथम मताधिकार प्राप्त झाला. त्याच वर्षी अमेरिकेतील वाटोमिंग या राज्यातील स्त्रींयाना मतांधिकार मिळाला. हळूहळू इतर राज्यामधून तो देण्यात आला.

पहिल्या महायुध्दाच्या काळांत स्त्रीयांनी बजावलेल्या कामगिरीमुळे इ.स.1918 मध्ये ब्रिटनमधील तीस वर्षावरील स्त्रियांना संसदीय निवडणुकीत मतदानांचा मर्यादित अधिकार दयावा असे ठरले. परंतु प्रत्यक्षात मात्र 10 वर्षांनी म्हणजेच 1928 मध्ये स्त्रीयांना पुरुषांबरोबर मतदांनाचा हक्क प्राप्त झाला.पुरुषांच्या बरोबरीने स्त्री काम करु शकते.हे सिध्द झाले. त्यामुळे जागतिक लोकमत स्त्रीयांना मताधिकार देण्यास अनुकूल झाले.उलट त्यांना वाटू लागले,स्त्रीयांच्या सहभागामुळे आरोग्य,बालसंगोपन,गृहनिर्माण ,स्त्री-पुरुष विषमता,स्त्री

शिक्षण,सा.विकास,कुटूंब कल्याण,गुलामगिरी यासारखे प्रश्न सुटण्यास परिणामकारक रित्या यश येते असा अनुभव आला. पुरुष प्रधानसंस्कृत्ती बदलून स्त्री - पुरुष समान हक्क मिळाले असा सर्वसाधारण आग्रह धरला जावू लागला.

पहिल्या महायुध्दाच्या वेळी सरकारी कचे-या कारखाने इ.सार्वजनिक ठिकाणी स्त्रीयांना नौकरी करणे भाग पडले. त्यामुळे प्रथमच स्त्रीया आर्थिक पारतंत्र्यातून बाहेर पडल्या.'

'1935 साली संसदेत भारत सरकार कायदा 1935 पारित केला आणि राष्ट्रीय संघीय संरचनेची स्थापना केली.1937 मध्ये डिप्रेशन क्लाससाठी जागा आरक्षित केल्या गेल्या 1937 मध्ये या कायदयामध्ये अंमलबजावणी झाली.

या कायदयामध्ये अनुसूचीत जाती - जमातीची संज्ञा वापरली आहे. ज्यायोगे समुहाला अशा जाती वंश किंवा जाती जमातीच्या अंतर्गत गटाचे भाग असे. संबोधण्यात आले. भारतीय राज्यघटनेच्या अनुसूचीत जाती- जमाती आदेश 1936 या सुचनेच्या व्याखेत स्पष्ट करण्यात आले. स्वातंत्र्यानंतर संविधान सभाने अनुसूचीत जाती - जमाती प्रचलीत परिभाषा चालू केली.'

'भारतीय राज्य घटनेच्या कलम 14,15,16 नुसार स्त्रीयांना कायदयापुढे समानता देण्यात आली. ते पुढील प्रमाणे कलम -14 प्रमाणे कायदयापुढे स्त्री पुरुष समानता,कलम - 15 नुसार नौकरी किंवा इतर हक्क देतांना स्त्री - पुरुष असा भेदभांव करण्यावंर प्रतिबंध घालण्यात आला.तर कलम - 16 व्या कायदाने नौकरी देतांना सरकारने स्त्री - पुरुष असा भेद करु नये असे म्हटले आहे.तर 326 व्या कलमानुसार प्रौढ मतदांनाचा हक्क दिला जातांना स्त्री - पुरुष असा भेद केला जात नाही. या सर्व कलमांत स्त्रीयांना समानता प्रत्यक्षपणे व स्पष्टपणे नमूद केलेली आढळते.म्हणून अनुसूचीत जमातीतील महिलांच्या विकासांवर आधुनिकिकरणांचा पडलेला प्रभाव सांगता येईल.'

2) समस्या सुत्रण :

संशोधनाचे नांव :- आधुनिकिकरणांचा अनुसूचित जमातीतील महिलांवर पडलेला प्रभाव. विशेष संदर्भ नांदेड जिल्हा

3) संशोधनाचा उददेश :-

1. आधुनिकिकरणांचा अनुसूचीत जमातीतील महिलांचा सामाजिक कौटुंबिक व आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.

2. अनुसूचीत जमातीतील महिलांमधील शैक्षणिक बदल अभ्यासणे.

3. अनुसूचीत जमातीतील महिला संस्कृती,राहणीमान व खाणपानातील बदलाचा अभ्यास करणे.

4. अनुसूचीत जमातीतील स्त्रीवादी चळवळ व आधुनिकिकरण यांचा सहसंबंध अभ्यासणे.

5. शासनांच्या अनुसूचीत जमातीतील महिलांच्या योजनाचा अभ्यास करणे.

6. आधुनिकिकरणाचे सामाजिक स्वरुप समजून घेणे.

4) संशोधनाचे गृहितके :

1. अनुसूचीत जमातीतील महिलांमध्ये शैक्षणिक विविधता निर्माण झाली आहे.

2. अनुसूचीत जमातीतील कुटूंब संस्था आधुनिकिकरणाच्या प्रभावाखाली आली आहे.

3. शासकिय सवलती व कायदे अनुसूचीत जमातीतील महिलांसाठी अधिक उपयुक्त आहेत.

4. अनुसूचीत जमातीतील महिलांचे सक्षमीकरण मोठया प्रमाणांत घडवून आणण्याचे प्रयत्न होत आहेत.

5. अनुसूचीत जमातीतील महिलांमध्ये पुरुषांपेक्षा अधिक गतिशीलता निर्माण झाली आहे.

5) संशोधनांची व्याप्ती :-

प्रस्तुत संशोधनाची व्याप्ती अप्रत्यक्षपणे अध्ययनाच्या उददेशातून व उपकल्पनांतून स्पष्ट झाली आहे.तरी सुध्दा या अध्ययनाची व्याप्ती स्पष्ट करतांना असे म्हणता येईल की, प्रस्तुत अध्ययन हे आधुनिकिकरणाचा अनुसूचीत जमातीतील महिलांवर पडलेल्या प्रभावांशी संबंधित असेल. यामध्ये अन्य व्यक्तींना समाविष्ट केल्या जाणार नाही.परंतु ज्या महिलांवर प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष प्रभाव पडला त्या सर्वांचा या अध्ययनांत समावेश करण्यात येईल.

6) **संशोधनाच्या मर्यादा :-**

प्रस्तुत अध्ययन महिला आणि आधुनिकिकरण या विषयी असून अध्ययन क्षेत्र नांदेड जिल्हापुरतचे मर्यादित आहे.यामध्ये अनुसूचीत जमातीतील महिला विकासांची माहिती असेल. राज्य पातळीवर महिलांचा विचार होत असला . तरी जिल्हा निहाय या कायदयाच्या स्वरुपात बददल असू शकेल.प्रस्तुत अध्ययनांत नांदेड जिल्हा हे कार्यक्षेत्र निवडले असल्यामुळे येथील अनुसूचीत जमातीतील महिलांचे नौकरीचे प्रमाण,शैक्षणिक स्थिती,लोकसंख्या,जिल्हा निहाय कमी जास्त प्रमाणांत असेल. त्यामुळे एक जिल्हयातून काढलेला निष्कर्ष सार्वत्रिक असू शकत नाहीत.यामध्ये नमुना निवड पध्दतीचा वापर असल्यामुळे अध्ययनांवर विशिष्ट मर्यादा ठेवण्यात येतील ज्यामुळे अध्ययनावर मर्यादा येतात.

7) अध्ययनाचे महत्व :-

प्रस्तुत संशोधनाचे महत्व अनुसूचीत जमातीतील महिलांविषयी असेल, या महिलांची शासकिय नोक-या तसेच सामाजिक,कौटुबिक,शैक्षणिक स्थिती जाणून घेण्यावर असेल,त्याचबरोबर या जमातीतील महिलांना कायदे विषयी ज्ञान आहे की नाही हे या संशोधनात शोधले जाईल.

8) अध्ययन क्षेत्र :

प्रस्तुत अध्ययनाचे क्षेत्र नांदेड जिल्हा हे असेल नांदेड जिल्हयांतील तालुक्यांचा अभ्यास तसेच अनुसूचीत जमातीतील महिलांच्या विकासामध्ये केंद्र व राज्य शासनाची भूमीका स्पष्ट केली जाईल. तसेच कुटूंब,समाज यांचीही भुमिका तपासली जाईल व त्यांच्यावरील आधुनिकिकरणांचा प्रभाव तपासला जाईल.

9) नमुना निवड :-

आधुनिकिकरणाचा अनुसूचीत जमातीतील महिलांवर पडलेला प्रभाव : एक समाजशास्त्रीय अभ्यास संदर्भ : नांदेड जिल्हा या अभ्यास विषयांच्या संशोधनासाठी स्तरीत यादृच्छीक नमुना निवड पध्दतीचा वापर करुन संशोधन केले जाईल. तसेच नांदेड जिल्हयातील 16 तालुक्यातून 8 तालुक्यातील 13 व 8 तालुक्यातून 12 अशी एकूण 200 संख्या निश्चित करण्यात येईल.

10) तथ्य संकलन :-

संशोधन विषयाच्या तथ्य संकल्पना मध्ये प्राथमिक व दुय्यम तथ्य संकलनाच्या साधनांचा वापर करण्यात येईल. प्राथमिक तथ्य संकलनानुसार अनुसूचीत जमातीतील महिलांच्या मुलाखती यासाठी मुलाखत निरिक्षण या साधनांचा वापर करण्यात येईल,तर दुय्यम तथ्य संकलनात संशोधन

क्षेत्रांतर्गत लिखीत उपलब्ध साहित्य,वृत्तपत्रे,मासिके,भारतीय समाजशास्त्रीय कोष,पुस्तके संदर्भ ग्रंथ इंटरनेटमधील माहितीचा वापर केला जाईल.

11) तथ्य प्रक्रिया :-

प्रस्तुत संशोधनासाठी संरचीत मुलाखत अनूसुचीव्दारे प्राप्त केलेल्या माहितीचे तथ्य प्रक्रियेने केल्या जाईल हे तथ्य प्रक्रियन मुख्यतः उददेश व उपकल्पना यावर अवलंबून असेल. साधारणतःप्रक्रियनाच्या प्रक्रियेत पुढील पायऱ्यांना अंतर्भाव केल्या जाईल.

1) संस्करण / संपादन :-

संस्करण करतांना सर्वप्रथम प्रत्येक मुलाखत अनूसुचीची क्रमवार मांडणी केल्या जाईल. त्यांना क्रमांक देऊन त्याची तपासणी करुन उत्तरदात्यांच्या सर्व नोंदी मुलाखत अनुसूचित घेण्यात आल्या आहेत का ? हे तपासण्यात येईल. तसेच उत्तरदात्यांनी दिलेली उत्तरे विसंगत असल्यास विविध प्रश्नांच्या विसंगतीचे सार पाहून विसंगती दूर केल्या जातील व संशोधनाच्या दृष्टीने निरुपयोगी माहिती असल्यास अशी माहिती वगळण्यात येईल.

2) वर्गीकरण :-

मुलाखत अनुसूचीव्दारे गोळा केलेल्या विविध प्रकारच्या व विस्कळीत माहितीला संघटीत स्वरुप देण्यासाठी त्यांना मोजक्या वर्गात विभाजीत केल्या जाईल. अनुसूचीमध्ये असलेल्या मुक्त प्रश्नांना जी विविध उत्तरे प्राप्त होणार आहेत. त्यांना समान वैशिष्टयांच्या आधारे गटामध्ये विभाजीत करण्यात येईल.

3) संकेतीकरण :-

वर्गीकरणांची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर प्राप्त उत्तरांना संकेत दिल्या जातील. जेणेकरुन सारणीकरनाला त्याचा उपयोग होईल.

4) संकेत पूस्तिका :-

प्रत्येक उत्तरांना संकेत दिल्यानंतर संकेत पुस्तिका तयार केल्या जाईल व त्याआधारे सर्व मुलाखत अनुसूचिना हाताळण्यात येईल ही संकेत पुस्तीका स्तंभ क्रमांक,प्रश्न क्रमांक,प्रश्न,प्रत्युत्तर प्रवर्ग व संकेत यांच्या आधारे तयार केलेली असेल.

5) स्थानांतर :-

संकेत पुस्तिका तयार झाल्यानंतर पुन्हा सर्व अनुसूची हाताळल्या जातील. अनुसूचीत असलेल्या उत्तरांना संकेत पुस्तिकेत असलेल्या संकेतानूसार संकेत दिल्या जातील.

6) मास्टर चार्ट :-

प्रत्येक अनुसूचीत निर्माण केलेले संकेतांचे स्थानांकरण झाल्यानंतर मास्टर चार्ट तयार करण्यात येईल. ज्याआधारे सारणी तयार करण्यास मदत होईल.

12) सारणी व तथ्य विश्लेषण :

मास्टर चार्टच्या आधारे तथ्य विश्लेषण करण्यात येईल.यासाठी सारणी तयार केल्या जाईल.व कोणती सारणी काय स्पष्ट करते याचे विश्लेषण केल्या जाईल.यामध्ये साध्या सारण्याचा उपयोग केला जाईल व आश्यकतेनुसार व्दिचल सारणी तयार केल्या जाईल व त्याआधारे तथ्यांचे विश्लेषण केल्या जाईल.

13) संशोधन आराखडा :

प्रस्तुत संशोधनांचे स्वरुप काही प्रमाणांत वर्णनात्मक तसेच विश्लेषणात्मक राहील.हे संशोधन वर्णनात्मक आहे कारण नमुन्यात येणा-या अनुसूचीत जमातीतील महिलांचा सामाजिक,कौटुंबिक,शैक्षणिक आर्थीक घटकांचा सहसंबध वर्णन करण्यात येईल. अनुसूचीत जमातीतील महिलांचा सध्यास्थितीचा तसेच त्यांचावर उत्तर आधुनिकतेचा पडलेला प्रभाव वर्णनाव्दारे स्पष्ट केला जाईल. या महिलांपुढे येणा-या अडचणी,महिलांसाठी शासनाने केलेल्या शासकिय योजना / धोरणे म्हणून हे अध्ययन विश्लेषणात्मक राहील.

14) निष्कर्ष व उपकल्पनांचे परिक्षण :-

तथ्य विश्लेषंनाच्या आधारे उददेश व उपकल्पनेला अनुसरुन निष्कर्ष मांडल्या जातील. तसे अध्ययनाच्या सुरुवातीला घेतलेल्या उपकल्पनांचे परिक्षण सुध्दा केल्या जाईल. यामध्ये किती उपकल्पना

खऱ्या ठरल्यात,जर उपकल्पना सिध्द झाल्या नाहीत तर त्यामागची कारणे काय असतील व यामधून कोणत्या नविन उपकल्पना निर्माण झाल्यात याचा देखील उहापोह केल्या जाईल.

15) सुचना व उपाययोजना :-

निष्कर्षाच्या आधारे सुचना व उपाययोजना सुचविल्या जातील. अनुसूचीत जमातीत महिलांच्या आर्थिक,कौटुंबिक,शैक्षणिक विषयक दृष्टीकोनांतून येणाऱ्या समस्या,कारणे,महिला सहभागातील या सबंधी समस्याचा अन्वयार्थ तपासून पाहून समस्या कमी होण्याच्या दृष्टीने उपाययोजना सुचविण्यात येतील.

प्रकरण निहाय रचना :-

1. ऐतिहासिक पार्श्वभूमी

2. साहित्याचा आढावा व संशोधन पध्दत

3.कौटुंबिक व सामाजिक पार्श्वभूमी

4. शैक्षणिक आणि आर्थिक पार्श्वभूमी

5.तथ्य संकलन आणि अर्थ निर्वचन

6. निष्कर्ष आणि शिफारशी

- संदर्भ ग्रंथसूची :

1. संपादक - जोशी.बी.आर, डायमंड सामाजिक ज्ञानकोष (खंड 2), प्रथम आवृत्ती 2007,पृ.1693

2. संपादक - गर्गे स.मा.,भारतीय समाज विज्ञान कोष खंड -2, प्रकाशन - 1987,व्दितीय आवृत्ती सप्टेंबर 2007,पेज 148-49

3. संपादक - गर्गे स.मा.,भारतीय समाज विज्ञान कोष खंड -3, प्रकाशन - 1989,व्दितीय आवृत्ती सप्टेंबर 2007,पेज 424-425

4. शोधगंगा वेबसाईट

5. उपकार प्रकाशन,यु.जी.सी.समाजशास्त्र,संपादक - डॉ.जी.एल.शर्मा.

6. संपादक - चौधरी राजेश अशोक,भारतांचे संविधान,प्रकाशन चौधरी लॉ पब्लिशर्स,आवृत्ती सातवी - 2015,पृ.11,12,13

7.संपादक - गर्गे स.मा.,भारतीय समाज विज्ञान कोष खंड -5, प्रकाशन समाज विज्ञान मंडळ पुणे- जानेवारी 1991,व्दितीय आवृत्ती डिसेंबर 2007,पेज 139

8. संपादक - प्रा.धुरी निलम,संशोधन पध्दती फडके प्रकाशन,पहिली आवृत्ती 2008.